# शासकीय वाहनांचा जाहीर लिलाव-नि-निविदा- सन-२०१५-२०१६

अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर यांचे अखत्यारीतील निर्लेखित केलेल्या वाहनांचा जाहिर लिलाव खालील नमुद केलेल्या ठिकाणी, वेळी व रोजी होणार आहे. तरी इच्छुक बोलीधारकांनी व निविदा धारकांनी सदर लिलावात सहभागी होण्यासाठी उपस्थित रहावे.

| लिलावाचा दिनांक व वेळ | वाहनांचा तपशिल | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|
| **दि.१०/०३/२०१६ सकाळी ११.३०वाजता** | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या जीप-६ तसेच टाटा इंडीगो कंपनीची १ कार अशी एकुण ७ वाहने. | निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.१ कार्यालय नगर-पुणे रोड, ता.जि. अहमदनगर पिन-४१४००१ |

जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात आलेल्या आहेत.

**अधीक्षक,**
**राज्य उत्पादन शुल्क,अहमदनगर**

महाराष्ट्र शासन

**अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,अहमदनगर यांचे कार्यालय.**

गांजा डेपो,स्टेशनरोड ता.जि.अ.नगर दु.क्र.०२४१/२४७०८६०

-----------------------o-----------------------

# जाहिर नामा

क्रमांकः-व्हिईएच ११२०१५/६१०३ अहमदनगर दिनांकः-०२/०३/२०१६

तमाम लोकांना कळविण्यांत येते की,या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या निरीक्षकांची खालील तक्यांत नमुद ७ वाहने शासन निर्णय वित्त विभाग क्र.विप्रअ १०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम दिनांक १५ मे २००९ चे परिशिष्ट व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उप विभाग दोन मधील अनु.क्र.१९ (क) नुसार प्राप्त असलेल्या अधिकारानूसार या कार्यालयाने निर्लेखित केलेली आहेत.शासकीय वाहने शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.डिएफपी-१०९१/प्र.४/विनिमय दिनांक १८.६.१९९१ मधील तरतुदीनूसार जाहिर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहेत.निर्लेखित करण्यांत आलेल्या शासकीय वाहनांचा जाहिर लिलाव निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,भरारी पथक क्र. १, अहमदनगर यांचे कार्यालय,नगर-पुणे रोड,ता.व.जि.अहमदनगर येथे **दिनांक १०.३.२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता** आयोजित करण्यांत आलेला आहे.

| अ.क्र | शासकीय वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | शासकीय वाहन निर्लेखित करण्यांत आल्याचा आदेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | एम.एच.०१ ७७६ | पिजोड महिंद्रा जीप | व्हिईएच ११२०१५/५७०४ दि.११.९.२००६ |
| २ | एम.एच.०१-४०९० | महिंद्रा जीप | व्हिईएच ११२०१५/५७०४ दि.११.९.२००६ |
| ३ | एम.एच.१६ ०१-४१२० | महिंद्रा जीप | व्हिईएच ११२०१५/५७०४ दि.११.९.२००६ |
| ४ | एम.एच.०१ बी.अे.१०४ | पिजोड महिंद्रा जीप | व्हिईएच ११२०१४/६१०३ दि.२९.१०.२०१४ |
| ५ | एम.एच.१६ १६ एन -१९१ | महिंद्रा जीप | व्हिईएच ११२०१४/८७६० दि.१९.११.२०१४ |
| ६ | एम.एच.१६ एन ०००३ | इंडिगो कार | व्हिईएच ११२०१४/अधी. दि.३.१२.२०१५ |
| ७ | एम.एच.१६ एन २७१ | महिंद्रा जीप | व्हिईएच ११२०१४/अधी. दि.२३.२.२०१६ |

**निर्लेखित केलेल्या शासकीय वाहनाच्या जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.**

**१.** लिलावात भाग घेऊ इच्छिणा-या इसमाने लिलावात भाग घेण्यांसाठी अनामत रक्कम रुपये १००० /- अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,अहमदनगर यांचे कार्यालयात रोख जमा करावे लागेल.

**२.** जो इसम वरील प्रमाणे अनामत रक्कम भरणार नाही त्यास लिलावाचे ठिकाणी प्रवेश दिला जाणार नाही.

**३.** लिलाव संपल्यानंतर सदरची अनामत रक्कम ज्याची असेल त्यास ती परत करण्यांत येईल.

**४.** लिलावात ज्याची बोली स्विकारली जाईल अशा इसमाने लिलावाच्या एकूण रक्कमेच्या १/४ इतकी रक्कम जागेवर रोख भरावी लागेल.बोलीच्या १/४रक्कम जागेवर रोख न भरल्यास अशा इसमाने अनामत ठेवलेली रक्कम रुपये १,०००/- सरकार जमा करण्यांत येईल.

**५.** यशस्वी बोली बोलणा-या इसमाने बोलीची उर्वरीत ३/४ इतकी रक्कम लिलावाच्या वेळे पासून **४८** तासांचे आंत कार्यालयीन लेखापाल यांच्याकडे भरावयाची आहे.सदरील मुदीत ३/४ रक्कम न भरल्यास अशा इसमाने भरलेले बोलीच्या १/४इतकी रक्कम सरकार जमा करण्यांत येईल व वाहनाचा फेर लिलाव करण्यांत येईल.

/२/

६. यशस्वी बोली बोलणा-या इसमाने बोलीची पुर्ण रक्कम भरल्याशिवाय त्यास लिलावात घेतलेले वाहन ताब्यात दिले जाणार नाही.

७. नमुद केलेली सर्व शासकीय वाहने जशी आहे त्या स्थितीमध्ये विक्री केली जातील.

८. ज्या वाहनाची रजिस्ट्रेशन व टॅक्सबुक उपलब्ध आहेत ती त्वरीत यशस्वी बोलीधारकास देण्यांत येतील व ज्या वाहनाची उपलब्ध नाहीत ती संबंधीत खात्याकडून उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी यशस्वी बोलीधारकाची राहील.रेकॉर्ड उपलब्ध नसल्यास त्याबाबतची जबाबदारी खात्यावर राहणार नाही.

९. यशस्वी बोलीधारकाने वाहन खरेदी केल्यानंतर आहे त्या स्थितीत घेऊन जाण्याची सर्व जबाबदारी संबंधीतावर राहील.

१०. ज्याची बोली मंजूर होईल त्यांना मुंबई विक्रीकर कायदा नियम ५९ चे तरतुदीनूसार जो काही महाराष्ट्र विक्रीकर ( व्हॅट टॅक्स ) एकूण मंजूर केलेल्या किंमतीवर होईल तो भरावा लागेल तसेच सदर वाहनासंबंधी आवश्यक कर/टॅक्स भरणे वाहन खरेदी करणा-यावर बंधनकारक राहील.

११. लिलावाच्या बाबतीत सर्वाधिकार शासकीय लिलाव कमिटीस राहतील व त्यांचा निर्णय शेवटचा व सर्वावर बंधनकारक राहिल.

१२. लिलावाच्या वरील शर्ती मधील एखादी शर्त काढून टाकणे किंवा त्यांत फेरबदल करण्याचा अधिकार लिलाव कमिटीस राहील.

*स्वाक्षरी /-*
**अधीक्षक,**
**राज्य उत्पादन शुल्क,**
**अहमदनगर.**

**प्रतः-**

**१) मा.आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना त्यांचे पत्र क्रमांक वाहने २०१५/२६/सहा दिनांक १९.८.२०१५ च्या संदर्भात माहितीस्तव सविनय सादर..**

**२) मा.विभागीय उप आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,पुणे विभाग,पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.**

**३) सर्व अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,-----------------------------**

**४) सर्व निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,अहमदनगर जिल्हा यांना माहितीस्तव रवाना.**